॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.१६ ( प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील विद्यार्थी विद्यार्थिनींच्या वस्तीगृहातील खानावळ ठेकेदार यांच्यासोबत कुलगुरू प्रा. व्ही एल माहेश्वरी यांनी बैठक घेऊन गॅस सिलेंडर पुरवठासंदर्भात आढावा घेतला.

सद्यस्थितीतील गॅस सिलेंडर संदर्भात निर्माण झालेली परिस्थिती लक्षात घेऊन विद्यापीठात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी विद्यार्थिनींना वस्तीगृहात भोजन व्यवस्थेकरिता विविध खानावळ चालवणे संदर्भात ठेका पद्धतीने काम देण्यात आले आहे. सदरच्या उद्भवलेल्या परिस्थितीच्या अनुषंगाने विद्यार्थी विद्यार्थिनींना भोजन व्यवस्था सुरळीत राहण्याकरिता विद्यापीठातील विविध खानावळ पुरवठादार यांच्या समवेत कुलगुरू प्रा. माहेश्वरी यांनी त्यांच्याकडून संवाद साधला असून त्यांच्याकडून माहिती घेण्यात येऊन गॅस सिलेंडर उपलब्ध ते संदर्भात उपाय योजना करण्याचे निश्चित करण्यात आले. यावेळी विद्यापीठाकडून प्र - कुलगुरू प्रा. एस टी इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, विद्यापीठ अभियंता इंजिनिअर राजेश पाटील उपस्थित होते. तर मुलांचे वस्तीगृह क्रमांक १,२,३, डॉ. एपीजे मुलांचे वस्तीगृह, मुलींचे वस्तीगृह क्रमांक १,२,३ व ४, बीजे मुलींचे वस्तीगृह, अल्पसंख्यांक मुलींचे वस्तीगृह अशा एकूण नऊ वस्तीगृहातील खानावळ पुरवठादार उपस्थित होते.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: १६ मार्च, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता